महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**
एस्ट्रेला बॅटरीज एक्सपॉन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला,
लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९,
दूरध्वनी क्र.०२२-६९४२५०००, वेबसाईट : www.mahagenco.in

---

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ दिनांक :

**महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.८९२ दिनांक.२९.०१.२०२५**

**विषय:-** जाहिरात क्र.०४/२०२४ अन्वये प्रसिध्द तंत्रज्ञ-३ पदाच्या शैक्षणिक अर्हतेत "टर्नर" या आय.टी.आय. व्यवसायाचा (Trade) समावेश करण्याबाबत आणि महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्तांपैकी अभियांत्रिकी पदवी / पदविकाधारक उमेदवारांना प्रगत कुशल प्रशिक्षणाचे अतिरिक्त गुण प्रदान करण्याबाबत.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४
२) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.१२११० दिनांक २८.११.२०२४
३) महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०२४ चे सुधारपत्र क्र.१९१ दिनांक ०७.०१.२०२५

-------------

महानिर्मिती कंपनीकडून तंत्रज्ञ-३ यांची रिक्त पदे भरण्यासाठी सरळसेवा भरतीतर्गत जाहिरात क्र.०४/२०२४ दि.२६.११.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरील जाहिरात व संदर्भिय क्र.०३ वरील सुधारपत्रानुसार, सामान्य (महानिर्मिती कंपनी बाहेरील उमेदवार) उमेदवारांसाठी, १७ व्यवसायांपैकी एका व्यवसायातील शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आय.टी.आय.) नियमित (रेग्युलर) कोर्स उत्तीर्ण / राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संबंधित व्यवसायासाठी दिलेले राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र (NCTVT)/ (MSCVT) धारण करणे आवश्यक असल्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

आता, जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता / आय.टी.आय.व्यवसायात "टर्नर" या व्यवसायाचा (Trade) समावेश करण्यात येत आहे. तरी, उपरोक्त शैक्षणिक अर्हतेतील सुधारणेबाबत सामान्य (महानिर्मिती कंपनी बाहेरील उमेदवार) उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदरील बदल लवकरच ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या लिंकमध्ये समाविष्ठ करण्यात येतील. त्यासाठी पात्र उमेदवारांनी वेळोवेळी महानिर्मिती कंपनीच्या संकेतस्थळावर भेट देऊन खात्री करुन घ्यावी. तसेच सध्याचे सुधारपत्र प्रसिध्द करण्यापूर्वी ज्या "टर्नर" व्यवसाय उत्तीर्ण उमेदवारांनी इतर व्यवसायांची निवड करुन ऑनलाईन अर्ज सादर केला असेल तर अशा उमेदवारांनी वरील सुधारीत शैक्षणिक अर्हतेस अनुसरुन नवीन अर्ज सादर करणे आवश्यक असेल. उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी की, त्यांनी सादर केलेल्या अर्जांपैकी नविनतम अर्ज (Latest Online Application) भरती प्रक्रियेसाठी विचारात घेण्यात येईल.

याशिवाय महानिर्मिती कंपनीचे पात्र प्रकल्पग्रस्त असलेल्या अभियांत्रिकी पदवी / पदविकाधारक उमेदवारांना, त्यांनी प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षण घेतले असल्यास, अशा प्रत्येक वर्षाकरीता ०५ गुण (कमाल २५ गुण) ऑनलाईन परीक्षेवेळी प्रदान करण्यात येतील.

तसेच उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी कालावधी मिळावा आणि ते अर्ज सादर करण्याच्या संधीपासून वंचित राहू नये, म्हणून अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकात वाढ करण्यात येत आहे. त्यानुसार अर्ज सादर करण्याचा अंतिम दि.३१.०१.२०२५ ऐवजी दि.१०.०२.२०२५ असा असेल.

याशिवाय जाहिरातीत व संदर्भिय सुधारणापत्रात नमूद इतर सर्व बाबी (सर्वसाधारण अटी, आरक्षणासंबंधीच्या अटी / नियम व इतर) अबाधीत राहतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(डॉ.नितीन वाघ)
कार्यकारी संचालक (मासं)

C:\Users\madhuri.Vengurlekar\Desktop\Tech-III Sudharpatra.doc

Scanned with OKEN Scanner